# नियुक्त्या
# मुंबई येथील उच्च न्यायालयाचा न्यायाधिकार

उच्च न्यायालय, मुंबई, मुख्यालय मुंबई तसेच नागपूर व औरंगाबाद खंडपीठांच्या आस्थापनेवर **"शिपाई/हमाल/फराश"** या पदाकरिता निवड यादी व प्रतिक्षा यादी, २ वर्षांकरिता तयार करण्यासाठी जाहिरात प्रसिध्दिच्या दिनांकास पात्रतेचे निकष व आवश्यक अटी पूर्ण करणा—या उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदाचे नाव | आस्थापना | एकूण रिक्त पदे (सद्यस्थितीत रिक्त असलेली पदे + पुढील दोन वर्षात रिक्त होणारी पदे | दिव्यांगासाठी आरक्षण पदे (४%) | निवड यादी | प्रतिक्षा यादी | नियमाप्रमाणे शिपाई/हमाल/फराश या पदाची वेतन मॅट्रिक्स |
|---|---|---|---|---|---|---|
| शिपाई/हमाल/फराश | उच्च न्यायालय, मुंबई | ५७० | २३ | ५४७ | १३७ | एस—३ ₹ १६,६०० — ₹ ५२,४०० व नियमाप्रमाणे भत्ते |
| | नागपूर खंडपीठ | ११५ | ५ | ११० | २८ | |
| | औरंगाबाद खंडपीठ | २०२ | ८ | १९४ | ४८ | |

**नोंद** :—दिव्यांगांसाठी राखीव असलेली पदे मुंबई उच्च न्यायालयाने मार्गदर्शक तत्वे तयार केल्यानंतर निकट भविष्यात भरण्यात येतील.

## अ) पात्रता :—

१) उमेदवार कमीत—कमी सातवी पास असावा.

२) वयोमर्यादा:—

| प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| खुला प्रवर्ग | १८ वर्ष | ३८ वर्ष |

| प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| महाराष्ट्र शासनाने निर्दिष्ट केलेल्या अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, इतर मागास वर्ग किंवा विशेष मागासवर्गातील उमेदवारांसाठी | १८ वर्ष | ४३ वर्ष |
| विहीत मार्गाने अर्ज करणा—या न्यायालयीन कर्मचारी /शासकीय कर्मचा—यांसाठी | १८ वर्ष | लागू नाही |

## ब) पात्र उमेदवारीकरीताच्या अटी:—

१) उमेदवार भारताचा नागरिक असावा आणि महाराष्ट्र राज्याचा अधिवासी (Domicile) असावा.

२) त्याचे/तिचे चारित्र्य आणि वर्तणूक चांगली असावी.

३) तो/ती करार करणेस सक्षम असावा/असावी.

४) त्याला/तिला नैतिक पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आले नसावे किंवा त्याला/तिला कोणत्याही न्यायालय/एम.पी.एस.सी. /यु.पी.एस.सी. किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडींमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे काढून टाकले नसावे किंवा अपात्र ठरवले नसावे.

५) त्याला/तिला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवले नसावे किंवा त्याच्या/तिच्याविरुद्ध फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

६) त्याला/तिला हयात असलेल्या पत्नी/पती ची संख्या एकापेक्षा जास्त नसावी.

७) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ नुसार, उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास, २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे, हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक नसावी.

३/...

## क) <u>ऑनलाईन शुल्क भरण्याची प्रक्रिया:—</u>

१) अर्जदाराने ऑनलाईन अर्ज करताना **₹ १०००/— परीक्षा शुल्क** केवळ **'SBI Collect'** या ऑनलाईन पेमेंट गेटवे सुविधेद्वारे भरणे आवश्यक आहे.

२) उमेदवारांना **'SBI Collect'** सुविधेद्वारे ऑनलाईन पेमेंटसाठी **'User Mannual'** मध्ये दिलेल्या निर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे.

३) अर्ज स्वीकारण्यासाठी फक्त यशस्वी पेमेंट झालेल्या व्यवहारांचाच विचार केला जाईल. कोणत्याही परिस्थितीत परीक्षा शुल्क परत दिले जाणार नाही. उमेदवाराने परत न मिळणारे शुल्क भरल्याने त्याला/तिला परीक्षेला उपस्थित राहण्याचा कोणताही हक्क निर्माण होत नाही. तसेच, उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्जांच्या शुल्काचा भरणा केल्यास, कोणत्याही परिस्थितीत ते शुल्क परत दिले जाणार नाही.

४) **'SBI Collect'** सुविधेद्वारे तयार केलेले नियम, अटी व शर्तींची कोणतीही जबाबदारी मुंबई उच्च न्यायालय प्रशासनाची नाही. ऑनलाईन पेमेंट करताना काही तांत्रिक बिघाड झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. या बाबत कोणत्याही स्वरूपाची चौकशी/दाव्याची दखल घेतली जाणार नाही.

## ड) <u>अर्ज करण्याची पध्दत :—</u>

१) अर्ज सादर करताना https://bombayhighcourt.nic.in या वेबसाईट वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करुनच अर्ज सादर करावा.

२) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज हा शक्यतो वेब ब्राउझरच्या (Web Browsers) माध्यमातून संगणकावर भरावा.

३) प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकाराने अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

४/ ...

४) पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज https://bombayhighcourt.nic.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १५/१२/२०२५ ते दिनांक ०५/०१/२०२६** पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्जाची लिंक **दिनांक १५/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडेल आणि दिनांक ०५/०१/२०२६ रोजी संध्याकाळी ५.००वाजता बंद होईल**.

५) ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना उमेदवाराने स्वत:चा अद्यावत पासपोर्ट साईजचा फोटो (३.५ सें.मी. X ४.५ सें.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी (३ सें.मी. X २.५ सें.मी.) स्कॅन करुन ४०KB पेक्षा जास्त साईज होणार नाही अशा पध्दतीने दोन स्वतंत्र फाईल्स **jpg/jpeg format** मध्ये करुन ऑनलाईन अर्जात दर्शविलेल्या ठिकाणी सदर फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे अनिवार्य आहे.

(**टिप.** फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी) प्रवेशपत्रावर/अर्जावर दुस—याचा फोटो/स्वाक्षरी असल्यास उमेदवारास निवडीच्या टप्प्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

६) उमेदवाराने **https://bombayhighcourt.nic.in** या वेबसाईट वर क्लिक करुन **Recruitment** मध्ये '**Peon/Hamal/Farash**' च्या **Apply Online** पर्याय (option) वर क्लिक करावे तद्नंतर **SBI Collect** द्वारे ऑनलाईन फी भरावी तद्नंतर **SB Collect Reference Number** प्राप्त होईल जो ऑनलाईन अर्जामध्ये अचूक नमूद करावा अन्यथा, सदर अर्ज नाकारण्यात येईल. तसेच यासंदर्भातील कोणतीही निवेदने स्वीकारली जाणार नाहीत.

७) ऑनलाईन अर्ज करताना उमेदवाराने फक्त **एकाच आस्थापनेची निवड** करावी. (उदा. मुख्यालय मुंबई, किंवा नागपूर खंडपीठ किंवा औरंगाबाद खंडपीठ). एकदा आस्थापनेची निवड करून अर्ज सादर केल्यानंतर, आस्थापनेत बदल करण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत स्वीकारली जाणार नाही. म्हणून उमेदवारांनी आस्थापनेची निवड करताना योग्य काळजी घ्यावी.

**नियुक्तीनंतर उमेदवारास नियुक्तीच्या दिनांकापासून ५ वर्षांची सेवा पूर्ण होईपर्यंत कोणत्याही ठिकाणी बदलीसाठी अर्ज करता येणार नाही.**

८) उमेदवाराने आपली सर्व माहिती योग्यरित्या भरुन झाल्यावर सर्वात शेवटी **I Agree** बटणावर क्लिक करुन अर्ज सादर (Submit) करावा. (एकदा माहिती सादर केल्यानंतर उमेदवाराला ऑनलाईन अर्जामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. तसेच त्यासंदर्भात उच्च न्यायालय प्रशासनाकडून कोणतीही तक्रार/दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही).

९) **उमेदवारांनी संपूर्ण जाहिरातीचे वाचन करूनच अर्ज भरावा.** संपूर्ण भरलेला अर्ज सादर (Submit) केल्यानंतर उमेदवाराने **Print Application** मध्ये जाऊन Registration ID Number व Date of Birth टाकून Print काढून त्या Printout वर दिलेल्या जागेवर स्वत:चा अर्ज भरताना **Upload** केलेला फोटो चिटकवावा आणि विहित जागेवर काळया पेनाने स्वाक्षरी करावी. अर्जाचे **Printout** स्वत:कडे जतन करून ठेवावे. सदरील अर्ज आणि शैक्षणिक कागदपत्रे या कार्यालयात **पोस्टाने पाठवू नये**. मात्र निवड प्रक्रियेदरम्यान दिलेल्या सूचनेनुसार आवश्यक त्यावेळी सदरील अर्जाची प्रत उपलब्ध करावी.

१०) ऑनलाईन अर्ज भरत असताना आपण जाहिरातीतील नमूद शैक्षणिक पात्रता/इतर बाबींची पूर्तता केली असेल तरच आपला अर्ज स्विकारला जाईल.

११) **उमेदवाराने एकापेक्षा जास्त ऑनलाईन अर्ज सादर केल्यास त्याचा/तिचा फक्त शेवटचा अर्ज व त्यासोबत भरलेले शुल्क विचारात घेतले जाईल.** याआधी सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. त्यामूळे उमेदवारांनी अर्ज भरतानांच काळजीपूर्वक भरावा.

## इ) निवड प्रक्रिया :

पात्र उमेदवारांना खालील निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

| क्र. | परीक्षेचा प्रकार | गुण | प्रश्नांचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १) | लेखी परीक्षा (उत्तीर्ण गुण किमान १५) | ३० गुण | लेखी चाचणीसाठी प्रश्नपत्रिकेमध्ये वस्तुनिष्ठ नानाविध निवडीचे प्रश्न असतील. **(objective type multiple choice questions)** |
| २) | शारीरिक क्षमता आणि विशेष अर्हता | १० गुण | —— |
| ३) | मुलाखत | १० गुण | —— |

**नोंद:** १) लेखी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना शारीरिक क्षमता आणि विशेष अर्हता या परीक्षेस बोलवण्यात येणार नाही.

२) वरील सर्व परीक्षांसाठीचे वेळापत्रक मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

## फ) ज्या उमेदवारांना मुलाखतीकरीता बोलवण्यात येईल, त्यांनी खालील कागदपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती त्यांच्या मुळ प्रमाणपत्रांसह पडताळणीसाठी मुलाखतीच्या वेळी सोबत आणाव्यात :

१) जन्मतारखेच्या पुराव्याचा दाखला. (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / जन्म प्रमाणपत्र / एस.एस.सी. चे बोर्ड प्रमाणपत्र)

२) शैक्षणिक पात्रतेच्या परिक्षेचे गुणपत्रक. (७वी, ८वी, ९वी, १०वी, १२वी किंवा तत्सम डिप्लोमा कोणत्याही मान्यता प्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठातून प्राप्त केलेला, इत्यादी)
(**नोंद :—** काही शाळांच्या/बोर्डाच्या गुणपत्रिका टक्केवारीऐवजी ग्रेडच्या स्वरुपात दिल्या जातात. या प्रकरणात, उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विषयनिहाय मिळालेले गुण, एकुण गुण आणि टक्केवारी असलेले गुणपत्रक संबंधित शाळा/बोर्डातून मिळवावे आणि ते गुण संबंधित रकान्यात दिलेल्या सूचनांनुसार भरावे. सदर गुणपत्रक उच्च न्यायालय प्रशासनाने वेळोवेळी मागविल्यास सादर करावे.)

३) शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र. (१०वी, १२वी, किंवा तत्सम डिप्लोमा कोणत्याही मान्यता प्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठातून प्राप्त केलेला, इत्यादी).

४) जाहिरात प्रसिध्दी नंतरची तारीख असलेली दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी दिलेली चारीत्र्य संपन्नतेविषयीचे प्रमाणपत्र.
(**Form- 'A'** नमुन्यात)

५) सक्षम अधिका—याने प्रदान केलेला जातीचा दाखला. (मागासवर्गीय उमेदवारांसाठी).

६) विशेष अर्हता असल्याबाबतचा दाखला.

७) महाराष्ट्रात अधिवास (Domicile) करीत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.

८) रोजगार विनिमय (Employment Exchange) कार्यालयात नोंदणी केली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

९) उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिका—यांची (कार्यालयाची) मंजुरी घेतल्याचे ना—हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

१०) उमेदवारांच्या नावात बदल असेल तर त्याच्या/तिच्या नावाच्या बदलाबाबत दस्तऐवज जसे की, शासकीय राजपत्र, सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह प्रमाणपत्राची प्रत इत्यादी.

११) संबंधित इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने.

१२) न्यायालय प्रशासनाने मागणी केल्यास इतर कोणतेही दस्तऐवज.

८/ ...

## ग) उमेदवारांकरीता इतर महत्वाच्या सूचना :—

१) उमेदवारास मराठी भाषा बोलता, वाचता आणि लिहीता येणे आवश्यक आहे.

२) परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे, याबाबत सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

३) सदरहू जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या पद संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. कोणत्याही कारणास्तव पदे कमी/जास्त झाल्यास निवड केलेल्या उमेदवारास नियुक्तीबाबत हक्क प्रस्थापित करता येणार नाही अथवा निवड प्रक्रिया रद्द झाल्यास कोणताही दावा सांगता येणार नाही.

४) अर्जदार जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र आहे असे समजून त्याला लेखी परीक्षेकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. मुलाखती/नियुक्ती पूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास त्याला मुलाखतीसाठी/नियुक्तीसाठी अपात्र ठरवले जाईल. याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

५) जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येनुसार व उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्तेनुसार **अल्पसुची (Shortlisting)** करण्याचे व त्यानुसार लेखी परीक्षेसाठी आणि/किंवा निवड प्रक्रियेच्या कुठल्याही टप्प्यावर, पात्र उमेदवारांची निवड करण्यासाठी गुणमर्यादा ठरविण्याचे सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय यांनी आपल्याकडे राखून ठेवले आहेत.

६) केवळ अर्ज दाखल केला यावरुन मुलाखतीचा किंवा नेमणूकीचा हक्क प्रस्थापित होणार नाही. तसेच उमेदवाराची उच्च शैक्षणिक पात्रता हा सदर पदाच्या निवडीसाठी मुख्य आधार मानला जाणार नाही.

९/...

७) परीक्षेच्यावेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणि पडताळणीसाठी स्वत:चे आधारकार्ड/पॅनकार्ड/वाहन परवाना इ. ओळखपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

८) मुलाखतीसाठी बोलावण्यात येणा—या उमेदवारांनी त्यांनी अर्जासोबत नमूद व दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी आणाव्यात. तसेच या कार्यालयास मान्य होईल असे स्वत:चे फोटो प्रमाणपत्र (Photo ID) जसे मतदार कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना यापैकी एखादा पुरावा आणावा.

९) पात्र उमेदवारांना (नेमलेल्या तारखांना) लेखी परीक्षा, शारिरीक क्षमता आणि विशेष अर्हता, मूळ प्रमाणपत्र तपासणी व मुलाखतीसाठी **स्व:खर्चाने** हजर राहावे लागेल.

१०) कार्यालयाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षित घटनेमुळे भरती प्रक्रियेचे वेळापत्रक बदलू शकते. असा बदल वेळोवेळी उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल. त्याकरीता **उमेदवारांनी उच्च न्यायालय, मुंबईच्या अधिकृत संकेतस्थळावर लक्ष ठेवावे.**

११) उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतची सूचना उशीरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेस लेखी परिक्षेस, शारिरीक क्षमता आणि विशेष अर्हता, मूळ प्रमाणपत्र तपासणीस किंवा मुलाखतीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास, उच्च न्यायालय प्रशासनाकडून याबाबत कोणतीही तक्रार/दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही.

१२) उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत.

१३) निवड प्रक्रिया सुरू झालेनंतर उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व परीक्षेचे वेळी दिलेली माहिती अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निर्दशनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड, नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

१०/...

१४) अल्पसुचीत पात्र उमेदवारांसाठी लेखी परीक्षा, शारीरिक क्षमता व विशेष अर्हता चाचणीचे तसेच मुलाखतीचे वेळापत्रक मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात येईल. उमेदवाराने परीक्षेचे प्रवेश प्रमाणपत्र **‘Admit Card’** वर क्लिक करुन प्रिंट काढून घ्यावे.

१५) उमेदवाराने लेखी परीक्षा तसेच शारिरीक क्षमता व विशेष अर्हता चाचणी मध्ये मिळविलेल्या गुणांच्या आधारे, तसेच त्याच्या अर्जाची छाननी व त्याने मुलाखतीचे वेळेस हजर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर उमेदवारांची मुलाखतीची पात्रता अंतिमरित्या ठरविण्यात येईल. फक्त पात्र उमेदवारांचीच मुलाखत घेण्यात येईल.

१६) उमेदवारांची निवड ही लेखी परीक्षा, शारिरीक क्षमता व विशेष अर्हता चाचणी आणि मुलाखतीत मिळविलेल्या गुणांच्या (Merit) आधारे केली जाईल.

१७) मंजूर केलेली **निवड यादी व प्रतिक्षा यादी** ही प्रसिद्धीच्या दिनांकापासून फक्त २ वर्षांसाठीच वैध राहिल. त्यास मुदतवाढ न दिल्यास सदरची निवड यादी व प्रतिक्षा यादी ही रद्द करण्यात येईल.

१८) निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती ही उच्च न्यायालयामार्फत करण्यात येणा—या उमेदवारांच्या वैद्यकीय तपासणी आणि संबंधित पोलीस स्टेशनकडून चारित्र्य पडताळणीच्या अहवालांवर अवलंबून असेल.

१९) निवड/प्रतिक्षा यादीतील उमेदवार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत कर्तव्यात सामिल होऊ शकला नाही तर त्याचे/तिचे नाव निवड/प्रतिक्षा यादीतून काढून टाकले जाईल.

२०) निवड यादीतील उमेदवार नियुक्तीच्या पदावर रूजू होण्यासाठी दिलेल्या कालावधीत रूजू न झाल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर किंवा निवड यादीतील उमेदवाराने पद स्वीकारल्यानंतर त्या यादीच्या वैधतेच्या कालावधीत राजीनामा दिल्यास किंवा तत्सम कारणामुळे पद रिक्त झाल्यास जर त्यावेळेस निवड यादी संपली असेल, तरच प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचा विचार करण्यात येईल.

२१) निवड/प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची नियुक्ती सुरुवातीला दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्याबद्दल प्रमाणपत्र जारी होईपर्यंत सदर उमेदवाराची सेवा कोणत्याही वेळी, कोणतीही नोटीस न देता किंवा कोणतेही कारण न देता समाप्त केली जाईल.

२२) **उमेदवाराने निवड समितीच्या सदस्यांना किंवा उच्च न्यायालयात काम करण्या—या अधिका—यांना/ कर्मचा—यांना भेटण्याचा किंवा त्यांच्यावर त्याच्या निवड प्रक्रियेसंबंधी व्यक्तीशः अथवा इतर कोणामार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला/तिला निवड प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल व यासंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.**

२३) याद्वारे सुचित करण्यात येते की, निवड प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर आवश्यक ते बदल करण्याचा सर्वाधिकार उच्च न्यायालयाच्या अधीन राहील.

२४) **नियुक्त उमेदवारास माननीय न्यायमूर्ती यांच्या निवासस्थानी तसेच न्यायालयीन इमारतीत सदर पदासाठी आवश्यक असणारी सर्व प्रकारची कामे करावी लागतील.**

२५) या निवड प्रक्रियेत निवड समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल.

**आदेशावरून**

**सही/—**
**महाप्रबंधक**
**मुंबई येथील उच्च न्यायालयाचा न्यायाधिकार**

**दिनांक : ८ डिसेंबर, २०२५**

# <u>ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शक सूचना</u>

१. संगणकीकृत प्रोग्रामद्वारे ऑनलाईन अर्जाची छाननी केली जाईल म्हणून ऑनलाईन अर्ज भरणे सुरु करण्यापूर्वी उमेदवाराने शिपाई/हमाल/फराश पदासंबंधीची संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचावी. ऑनलाईन अर्ज हा इंग्रजी भाषेत भरला जाईल.

२. **'शिपाई/हमाल/फराश' पदासाठी इयत्ता ७ वी मधील गुण नमूद करणे अनिवार्य असेल. 'शिपाई/हमाल/फराश' पदासाठी जर उमेदवार इयत्ता ७ वी ची परीक्षा उत्तीर्ण असेल आणि त्याच्याकडे/तिच्याकडे इयत्ता ७ वी चे गुणपत्रक नसेल व त्याच्याकडे/तिच्याकडे पुढील उच्च अर्हता प्राप्त असेल उदा. ८ वी, ९ वी, १० वी किंवा १२ वी इत्यादी असेल तर, त्याने/तिने ऑनलाईन अर्ज भरताना इयत्ता ७ वी चे गुणपत्रक नाही असा पर्याय निवडून इयत्ता ७ वी ची माहिती (जसे की, Educational Qualification, School and Year of Passing) "Details of Educational Qualification" मध्ये नमूद करावी. अशा प्रकरणांमध्ये इयत्ता ७ वी साठी काल्पनिकरित्या एकूण १०० पैकी ५० गुण प्राप्त (म्हणजेच ५०%) अशी नोंद होईल. अशा उमेदवारांनी त्यांची उच्च शैक्षणिक पात्रता देखील भरणे अनिवार्य आहे. अन्यथा त्याचा/तिचा अर्ज संगणक प्रणालीद्वारे स्विकृत केला जाणार नाही.**

**जर उमेदवाराकडे इयत्ता ७ वी च्या पुढील उच्च अर्हता नसेल व त्याच्याकडे/तिच्याकडे इयत्ता ७ वी चे गुणपत्रक नसेल तर त्याचा/तिचा अर्ज संगणक प्रणालीद्वारे स्विकृत केला जाणार नाही.**

३. ऑनलाईन अर्जातील माहिती भरण्यापूर्वी उमेदवाराने परिक्षा शुल्क **₹ १०००/— 'SBI Collect'** द्वारे ऑनलाईन पेमेंट गेटवे (Payment Gateway) या सुविधेद्वारे ऑनलाईन शुल्क भरावे तद्नंतर **SB Collect Reference Number** प्राप्त होईल तद्नंतर ऑनलाईन अर्ज भरावा.

४. ऑनलाईन अर्ज हा शक्यतो वेब ब्राउझरच्या (Web Browsers) माध्यमातून संगणकावर भरावा.

५. ऑनलाईन अर्जातील संपूर्ण माहिती अचूक भरणे उमेदवारास बंधनकारक आहे.

६. ऑनलाईन अर्ज भरणे सुरु करण्यापूर्वी उमेदवाराने स्वत:चा अद्यावत पासपोर्ट फोटो आणि स्वाक्षरी स्वतंत्र स्कॅन करुन ४० **KB** पेक्षा जास्त साईज होणार नाही अशा पध्दतीने **jpg /jpeg format** मध्ये दोन वेगवेगळया फाईल्स तयार ठेवाव्यात.

७. ऑनलाईन अर्ज करताना उमेदवाराने फक्त **एकाच आस्थापनेची निवड** करावी. (उदा. मुख्यालय मुंबई, किंवा नागपूर खंडपीठ किंवा औरंगाबाद खंडपीठ).

८. उमेदवाराने माहिती भरताना संपूर्ण नावाचे (spelling) त्याच्याजवळ उपलब्ध असलेल्या शैक्षणिक कागदपत्रानुसार अचूक नमूद करावे.

९. उमेदवाराने पत्रव्यवहाराचा अचूक पत्ता पिनकोडसहीत द्यावा. अर्धवट पत्ता देऊ नये.

१०. उमेदवाराने उपयोगात असलेलाच ईमेल आयडी (email id), मोबाईल क्रमांक द्यावा.

११. उमेदवाराने आपली जन्मतारीख, शैक्षणिक कागदपत्रे/जन्मप्रमाणपत्राद्वारे अचूक लिहावी.

१२. उमेदवाराने स्वत:चा आधार कार्ड क्रमांक अचूक नमूद करावा.

१३. उमेदवाराने त्याच्या शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारे अर्जात अचूक शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेबाबत माहिती भरताना उमेदवाराने त्याची पात्रता खाली दिलेल्या क्रमानुसार नमूद करावी.

१. ७ वी (7th standard)
२. एस.एस.सी. (S.S.C.)
३. एच.एस.सी. (H.S.C.) किंवा तत्सम डिप्लोमा कोणत्याही मान्यता प्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठातून प्राप्त केलेला

(**नोंद :—** काही शाळांच्या/बोर्डाच्या गुणपत्रिका टक्केवारीऐवजी ग्रेडच्या स्वरुपात दिल्या जातात. या प्रकरणात, उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विषयनिहाय मिळालेले गुण, एकुण गुण आणि टक्केवारी असलेले गुणपत्रक संबंधित शाळा/बोर्डातून मिळवावे आणि ते गुण संबंधित रकान्यात दिलेल्या सूचनांनुसार भरावे.)

१४. शैक्षणिक माहिती भरताना, जे उमेदवार इयत्ता दहावीपेक्षा कमी शैक्षणिक अर्हता असणारे (Below S.S.C.) आहेत त्यांनी School/Board/University या रकान्यामधे शाळेचे नांव लिहावे.

१५. उमेदवारास ज्या भाषांचे ज्ञान आहे ती भाषा निवड (select) करावी.

१६. उमेदवाराने विशेष अर्हता (Special Skill) रकान्यात माहिती भरताना त्याला/तिला अवगत/अनुभव असलेली विशेष अर्हता नमूद करावी. जसे की, विद्युत कामे (Electrician Work), नळदुरूस्ती (Plumbing), बागकाम (Gardening), स्वयंपाक (Cooking) किंवा तत्सम किरकोळ देखभाल व दुरूस्ती कामे, कार्यालयीन व्यवस्थापन जसे की, फाईल्स/कागदपत्रे/साहित्य विनियोजन, स्वच्छता व देखभाल (Office Work Management such as allocation of files/papers/materials, Cleaning and Maintenance), वाहन चालविणे (Driving), फोटोकॉपी मशीन वापरणे विषयीचे ज्ञान (Knowledge of operating Photocopy Machine), संगणक विषयीचे ज्ञान (Computer Knowledge), इत्यादी.......

१७. उमेदवाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास किंवा पुर्वी एखाद्या प्रकरणात फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती द्यावी तसेच न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकिय कर्मचारी यांचेवर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित असल्यास तसे अर्जात नमूद करावे. खरी माहिती दडवून ठेवल्यास उमेदवार नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरेल. नियुक्तीनंतर सदर माहिती प्रशासनाच्या निदर्शनास आल्यास उमेदवारास कोणतीही पूर्वसूचना न देता नोकरीवरुन कमी केले जाईल.

१८. उमेदवाराने त्याला/तिला ओळखत असलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींकडून चांगली वर्तणूक व चारित्र्याबाबतचा दाखला (ऑनलाईन जाहिरातीसोबत जोडलेल्या **Form 'A'** नमुन्यात) प्राप्त करावा आणि अर्ज भरताना सदरील व्यक्तींची माहिती अर्जात नमूद करावी. सदरील दाखला हा जाहिरात प्रसिद्धीनंतरच्या तारखेचा असावा. सदरील प्रतिष्ठित व्यक्ती हि उमेदवाराची जवळची नातेवाईक/मित्र नसावी.

१९. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात योग्य त्या ठिकाणी, **४० KB** पेक्षा कमी आकार असलेल्या स्वतःच्या स्कॅन **फोटोची** jpg / jpeg format मधील फाईल Upload करावी. सदरील स्कॅन फोटो स्पष्ट दिसणारा असावा.

२०. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात योग्य त्या ठिकाणी, **४० KB** पेक्षा कमी आकार असलेल्या स्वतःच्या स्कॅन **स्वाक्षरीची** jpg / jpeg format मधील फाईल Upload करावी. सदरील स्कॅन स्वाक्षरी स्पष्ट दिसणारी असावी.

२१. अर्ज Submit करण्यापूर्वी उमेदवाराने भरलेला अर्ज बरोबर आहे याची खात्री करावी, Declaration चे वाचन करावे व नंतरच **I Agree** या बटणावर Click करावे. अर्ज Submit झाल्यावर उमेदवारास अर्जात कोणताही बदल करता येणार नाही.

२२. अर्ज Submit झाल्यानंतर येणारा **Registration ID Number** उमेदवाराने नमूद करुन घ्यावा आणि **Print Application** हा पर्याय (option) निवडून ऑनलाईन अर्जाची Print out काढावी.

२३ सदरील Printout काढल्यानंतर शेवटी दिलेल्या जागेवर उमेदवाराने आपला स्वत:चा फोटो चिटकवावा आणि सोबतच्या रकान्यामध्ये काळया पेनाने स्वत:ची सही करावी. सदरील Printout उमेदवाराने आपल्याकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वत:जवळ जतन करून ठेवावी.

**By order,**

**Sd/-**

**Date : 8th December, 2025**

**Registrar General**
**High Court of Judicature at Bombay**

# Form 'A'

## नमुना 'अ'

## चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ........................................................................................ हे/हया................................................................................., तालुका........................, जिल्हा........................., येथील रहिवासी असून, मी त्यांना मागील ................ वर्षापासून ओळखतो, त्यांची वर्तणूक व चारित्र्य चांगले आहे. ते/त्या माझे/माझ्या नातेवाईक नाहीत.

करिता सदरील वर्तणूक/चारित्र्य प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

दिनांक:—.................... प्रमाणपत्र देणाऱ्याचे नाव, व्यवसाय, सही, पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक :

ठिकाण:—...................

सही :— .............................................

नाव :— .............................................

व्यवसाय :—..........................................

पत्ता :— .............................................

.............................................

...............................................

भ्रमणध्वनी क्रमांक ..................................

**********************